ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे •अंक २९५ • शनिवार दि.२२ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## ऐन सणासुदीत दरवाढ;केंद्राची साखर आयातीला परवानगी



### काँग्रेसकडून इथेनॉल धोरणावर टीकास्त्र

नवी दिल्लीः साखरेचा पुरवठा वाढवून दर आटोक्यात आणण्यासाठी १० लाख मेट्रिक टन कच्ची साखर शुल्कमुक्त आयात करण्यास केंद्र सरकारने सवलतीसह परवानगी दिली आहे. ही आयात ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत करता येणार आहे. जवळपास दशकभरानंतर भारताने मोठ्या प्रमाणावर साखर आयातीचा मार्ग स्वीकारला आहे. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी साखर दरवाढीस केंद्र सरकारचे इथेनॉल धोरण अर्थात ई-२० जबाबदार असल्याचे टीकास्त्र सोडले आहे.

सणासुदीपूर्वी साखरेच्या वाढत्या दरांनी सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराचे बजेट बिघडण्याची शक्यता निर्माण झाल्याने केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी) आज याबाबत एक अधिसूचना जारी केली. आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून तयार होणारी शुद्ध साखर देशांतर्गत बाजारात विकणे बंधनकारक राहणार आहे. पात्र साखर कारखाने व रिफायनर्सना २१ ते २८ ऑगस्टदरम्यान टीआरक्यूसाठी अर्ज करता येणार असून, १५ ऑक्टोबरपर्यंत आयात पूर्ण करण्याचे आश्वासन देणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.साखरेच्या वाढत्या दरांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. १८ ऑगस्ट रोजी किरकोळ साखरेचा देशातील सरासरी दर ५२.३० रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचला होता. तर कारखाना पातळीवरील सरासरी दर ५,४०० ते ५,५०० रुपये प्रतिक्विंटलवर गेला आहे. सणासुदीच्या काळात गणेशोत्सव, दसरा आणि दिवाळीमुळे साखरेची मागणी वाढत असल्याने पुरवठा सुरळीत ठेवण्याचे सरकारसमोर आव्हान आहे.याच पार्श्वभूमीवर केंद्राने मोठ्या प्रमाणात साखर वापरणाऱ्या ग्राहकांवरही साठा मर्यादा लागू केली आहे. महिन्याला १० टनांपेक्षा जास्त साखर वापरणाऱ्या मिठाई विक्रेते, शीतपेय उत्पादक, खाद्यप्रक्रिया उद्योग आणि अन्य संस्थात्मक ग्राहकांना १५ दिवसांच्या वापरापेक्षा अधिक साठा ठेवता येणार नाही. ही मर्यादा १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहणार आहे.

**काँग्रेसकडून टीकास्त्र**

दरम्यान, साखरेच्या दरवाढी वरून काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी साखरेचा पान ४ वर

## मराठवाड्यात २ हजार १३४ कोटींचा महाघोटाळा उघड

### १६ कंपन्यांशी संगनमत करून निधी थेट परदेशात;उदगीरमध्ये गुन्हे दाखल

उदगीरः विविध १६ कंपन्यांशी संगनमत करीत उदगीर येथील एका व्यक्तीने तब्बल २ हजार १३४ कोटी ७९ लाख ४३ हजार ७३० रुपयांचा प्रचंड आर्थिक फसवणुक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. याबाबत रात्री उदगीर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने मराठवाडा आणि लातूर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, उदगीर शहरात गेल्या तीन दिवसांपासून आयकर विभागाच्या विविध पथकांकडून चौकशी सुरू होती. या चौकशीतून अखेर हा महाघोटाळा समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उदगीरमधील मोंढा भागात चौकशीसाठी आयकर विभागाचे पथक तीन दिवसापासून ठाण मांडून आहे. तपासानंतर पथकातील अधिकारीही हा प्रकार पाहून चक्रावून गेले. हा महाघोटाळा असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांनी उदगीर शहर पोलिस ठाण्यात रात्री उशिरा फिर्याद दिली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील उपआयकर विभागाचे संचालक दीपक कुमार यांनी या संदर्भात तक्रार दाखल केली आहे.दरम्यान, या प्रकारणी श्याम शिवप्रसाद कलानी याच्यासह इतर १६ कंपन्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३२४, २२१ आणि ३(५) अंतर्गत फसवणूक आणि अफरातफरीचा गुन्हा दाखल केला आहे. श्याम शिवप्रसाद कालानी याने १६ कंपनींना संगणमत करून हा घोटाळा केला आहे. तर यात परदेशी निधी पाठवण्याच्या व्यवहाराची खोटी आणि बनावट प्रमाणपत्र तयार केली आहेत. चुकीच्या पद्धतीचा वापर करून आर्थिक लाभाच्या हेतूने निधी परदेशी पाठवण्यास मदत केल्याचं बोललं जात आहे. तर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता लातूरचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे पान ४ वर

## सहाय्यक संचालक महेंद्र पवार यांच्या काळात मंजुर झालेल्या लेआऊट,फेरलेआऊटची चौकशी करावी-महेश खोमणे

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील तत्कालीन सहाय्यक संचालक महेंद्र पवार यांनी शासनाचे नियम धुडकावून लेआऊट व वाढीव लेआऊट मंजूर केले आहे. या सर्व प्रकाराची तात्काळ चौकशी करावी अशी मागणी भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य व महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते महेश खोमणे यांनी एका निवेदनाद्वारे महापालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.



सहाय्यक संचालक महेंद्र पवार हे २०२३ ते २०२६ या काळात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये सहाय्यक संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या काळात शहरातील अनेक लेआऊट व फेरलेआऊट मंजूर करण्यात आले आहे. सदरील प्रस्तावांना मंजुरी देतांना नियमांचे पालन झालेले नाही. वाढीव लेआऊट व फेरलेआऊट मंजूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झालेला आहे. पैसे घेवूनच महेंद्र पवार यांनी अनेक प्रस्तावांना मंजुरी दिली. शासनाचे नियम धुडकावून तसेच आवश्यक असलेले कागदपत्रांची व तांत्रिक अटीची पुर्तता न करता महेंद्र पवार यांनी मनमानी पणाने प्रस्ताव मंजूर केले. लेआऊट मंजुरी प्रकरणात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप होत असल्याने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची बदनामी होत आहे. यासर्व प्रकरणाची लेआऊट, फेरलेआऊट व वाढीव लेआऊट मंजूर करण्यात आलेल्या प्रस्तावांची तात्काळ चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी महेश खोमणे यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## गावठी पिस्टल बाळगणाऱ्या दोन जणांना पोलीसांनी केले जेरबंद

नांदेड/प्रतिनिधी-गावठी पिस्टल घेवून फिरणाऱ्या दोन जणांना शुक्रवारी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी नावघाट परिसरातून अटक केली आहे.

गावठी पिस्टल खरेदी व विक्री करणाऱ्या विरुद्ध जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी कारवाईची धडक मोहिम सुरु केली आहे. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरुन फौजदार महेश कोरे व पोलीस कर्मचारी शुक्रवारी नांदेड शहरात गस्त घालीत होते. खबऱ्याकडून मिळालेल्या गुप्त माहितीनुसार नावघाट परिसरात दोन तरुण संशयास्पदरित्या फिरत असल्याची माहिती त्यांना मिळाली. फौजदार महेश कोरे व पोलीस कर्मचाऱ्यांनी नावघाट भागातील व्यायाम शाळेजवळ संशयास्पद फिरणाऱ्या मोहम्मद फयाज अब्दुल रऊफ (वय २९) रा.गोल्डन बेकरी, देगलूरनाका, नांदेड व मोहम्मद समीर मो.ताहेर अन्सारी (वय २६) रा.दुल्हेशाह रहेमाननगर, नांदेड यांना अटक केली. पोलीसांनी दोघांची अंगझडती घेतली असता मो.फयाज अब्दुल रऊफ याच्या कमरेला गावठी पिस्टल व एक जीवंत काडतुस आढळून आले. पोलीसांनी सदरील गावठी पिस्टल व काडतुस जप्त केले आहे.



आरोपीने सदरील गावठी पिस्टल हे परवेज बेग हाजी बेग रा.देगलूरनाका,नांदेड याच्याकडून खरेदी केल्याची कबुली दिली. पोलीस परवेज बेग याचा शोध घेत असून तो सध्या फरार आहे. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जरांगे पाटील उपोषणावर ठाम

### माजी मंत्री आ.सत्तारांची भेट निष्फळ

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्याचा निर्धार व्यक्त केल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी आज मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन उपोषण टाळण्याची विनंती केली. मात्र, उपोषण करणारच, अशी ठाम भूमिका जरांगे पाटील यांनी घेतली.

अब्दुल सत्तार आणि जरांगे पाटील यांच्यात तब्बल एक तासाहून अधिक काळ चर्चा झाली. २९ ऑगस्टच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.यावेळी अब्दुल सत्तार यांनी जरांगे पाटील यांना उपोषण टाळण्याची विनंती केली. सरकार तुमच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तुमच्या विरोधात नाहीत. तुमच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक भूमिका घेत आहे. त्यामुळे तुम्ही उपोषणाचा निर्णय मागे घ्यावा आणि आपल्या प्रकृतीची काळजी घ्यावी, असे सत्तार यांनी सांगितले.मात्र, सत्तार यांच्या विनंतीनंतरही जरांगे पाटील आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. सरकारने समाजाचे वाटोळे केले आहे. आता उपोषण करणारच, असे त्यांनी स्पष्ट केले. समाजाशी दगा करून आपण कधीच जगू शकत नाही, असेही ते म्हणाले.मुंबईत आंदोलन करण्याच्या भूमिकेचाही जरांगे पाटील यांनी पुनरुच्चार केला. आम्ही मुंबईत येणार आहोत. आम्ही म्हणतो फडणवीस साहेब आमचे आहेत, पान ४ वर

### काँग्रेस-एबीव्हीपी भिडले

## 'छात्रों की गूंज'वरुन पुण्यात राडा

पुणे:राहुल गांधी यांच्या छात्रों की गूंज कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ परिसरात शुक्रवारी रात्री काँग्रेसची विद्यार्थी संघटना एनएसयूआय आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी)चे कार्यकर्ते भिडले. धक्काबुक्की आणि मारामारीत युवक काँग्रेसचे आनंद दुबे आणि रिहान बाबुडे जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

राहुल गांधी यांचा छात्रों की गूंज कार्यक्रम शनिवारी (दि.२२) एआयएसएसएमएसच्या मैदानावर होणार असून, त्यात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.काँग्रेसच्या युवक कार्यकर्त्यांनी एबीव्हीपीच्या कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना राहुल गांधींच्या कार्यक्रमाला उपस्थित राहू नये, यासाठी धमकावल्याचा आरोप केला. त्यानंतर दोन्ही गट आमनेसामने आल्याने वातावरण चिघळले.काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. दोन्ही गटांकडून एकमेकांवर आरोप करण्यात आले आहेत.विजय वडेट्टीवार यांनी विद्यार्थिनीवर दबाव आणून जबाब बदलण्यास भाग पाडल्याचा आरोप केला. पोलिसांनी काँग्रेसच्या पान ४ वर


## मोक्का गुन्ह्यातील सात गुन्हेगारांना इतर ठिकाणच्या कारागृहात हलविले

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा कारागृहात बंदीस्त असलेल्या मोक्का गुन्ह्यातील सात गुन्हेगारांना राज्यातील इतर कारागृहात हलविण्यात आले आहे.

नांदेड शहर व परिसरात गुन्हेगारांना संघटीत करुन गुन्हेगारांच्या टोळ्या तयार झाल्या आहेत. गुन्हेगारांच्या या टोळ्यांनी सर्वसामान्य जनतेमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जबरी खंडणी, सुपारी घेवून खून, खुनाचा प्रयत्न व अन्य गंभीर स्वरुपाचे गुन्हे टोळ्यातील गुन्हेगारांनी केलेले आहेत. गुन्हेगारांच्या टोळ्यामधील वादातून हिंसक घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू लागला. टोळीच्या म्होरक्यांना व त्यांच्या साथीदारांना पोलीसांनी अटक केली असून त्यांच्या विरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलीसांनी अटक केलेले गुन्हेगार नांदेड जिल्हा कारागृहात बंदीस्त असून तेथुनही टोळीचे सुत्र हलवित आहेत. गुन्हेगाराच्या टोळीतील आरोपी हे नांदेड जिल्हा कारागृहात एकत्र असल्याने कारागृहातील अंतर्गत सुरक्षितता व शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी जिल्हा कारागृहात बंदीस्त असलेल्या गुन्हेगारांच्या टोळी प्रमुखांना व त्यांच्या साथीदारांना कारागृहातून इतर जिल्ह्याच्या कारागृहात स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव राज्याच्या पोलीस महासंचालकांकडे पाठविण्यात आला होता. गृह विभाग व कारागृह प्रशासनाने सदरील प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. न्यायालयाच्या परवानगीने पोलीसांनी मोक्का अंतर्गत अटक असलेले सराईत गुन्हेगार कैलाश जगदीश बिगानीया, अनिल उर्फ पंजाबी सुरेश पवार, साईसिंग उर्फ लाला दीपकसिंग गहेरवार, ईश्वरसिंघ जयवंतसिंघ गिरणीवाले, सुरेंद्रसिंघ उर्फ सुरज जगदसिंघ गाडीवाले, आशु पाटील उर्फ कमलेश बालाजी लिंगापुरे, मिर्झा शबीर बेग मिर्झा गफार बेग यांना राज्यातील इतर मध्यवर्ती कारागृहात हलविण्यात आले आहे.

### यात्रा लाखों भाविकांची;प्रशासन मात्र झोपेतच

## माहूरच्या धार्मिक उत्सव यात्रेच्या नियोजनाला मुहूर्त कधी?



माहूर/प्रतिनिधी- श्रीक्षेत्र माहूरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवाची ओळख असलेली नारळी पौर्णिमा परिक्रमा यात्रा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असताना प्रशासनाला मात्र या लाखो भाविकांच्या यात्रेचे नियोजन करण्याचा विसर पडल्याचे चित्र आहे. पूर्वी या यात्रेच्या तयारीसाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत व्यापक आढावा बैठका घेतल्या जात होत्या. मात्र यंदा अद्याप नियोजनाची ठोस बैठक न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दि.२७ ऑगस्टपासून सुरू होणारी ही परिक्रमा यात्रा नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने लाखो भाविकांना माहूरकडे आकर्षित करते. राज्यासह परराज्यांतून येणारे भाविक सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेल्या विविध देवी-देवतांचे दर्शन घेत परिक्रमा पूर्ण करतात. दत्तशिखर, कमंडलूतीर्थ, काळापाणी, अनुसया माता मंदिर परिसर, सयामाय टेकडी, मातृतीर्थ, पांडवलेणी, देवदेवेश्वरी, वनदेव, कैलास टेकडी, शेख फरीद बाबा दर्गा आणि सर्वतीर्थ अशा विविध धार्मिक स्थळांना भेट देत भाविक परिक्रमा करतात. यंदा दत्तशिखर संस्थानचे महंत आणि संस्थानकडून यात्रेसाठी विशेष तयारी करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी संस्थान स्तरावर खबरदारी घेतली जात आहे. मात्र लाखो भाविकांच्या सुरक्षेची, वाहतूक व्यवस्थेची, पिण्याच्या पाण्याची, आरोग्यसेवेची, स्वच्छतेची आणि आपत्कालीन व्यवस्थेची अंतिम जबाबदारी असलेले प्रशासन मात्र अद्यापही निष्क्रिय असल्याचा आरोप भाविकांकडून होत आहे. यात्रा तोंडावर, मग नियोजन कधी? हा सवाल आता भाविक उपस्थित करीत आहेत. यात्रा सुरू होण्यास अवघे काही ३ दिवस शिल्लक असताना प्रशासनाने अद्याप व्यापक स्वरूपाची बैठक घेतली नसेल, तर ऐन यात्रेच्या काळात हजारो-लाखो भाविकांच्या व्यवस्थेचा बोजवारा उडाल्यास त्याची जबाबदारी कोणाची? असा संतप्त सवालही उपस्थित होत आहे.

दरवर्षीप्रमाणे शेवटच्या क्षणी बैठक घेऊन कागदी घोडे नाचविणे, अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या वाटप करणे आणि बैठकीचा सोपस्कार पूर्ण करणे एवढ्यावरच नियोजन मर्यादित राहणार असेल, तर त्याचा यात्रेला प्रत्यक्ष किती फायदा होणार? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ये रे माझ्या मागल्या पद्धतीचे नियोजन करून लाखो भाविकांची यात्रा सुरक्षित पार पाडता येणार नाही, अशी भावना माहूरमध्ये व्यक्त होत आहे. यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, आरोग्य विभाग, महसूल, नगरपंचायत, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, वीज वितरण, आपत्ती व्यवस्थापन तसेच संबंधित पान ४ वर

## गोड साखरेची कडू कहानी

सणासुदीचे दिवस जवळ आले की, बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. घराघरांत फराळाची तयारी सुरू होते, मिठाईचे पदार्थ बनवण्याचे नियोजन होते आणि गोडधोड करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी सुरू होते. मात्र यंदा या आनंदावर महागाईचे सावट अधिक गडद होताना दिसत आहे. काल अचानक साखरेच्या दरात झालेल्या वाढीने सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला चांगलीच झळ बसणार आहे. विशेष म्हणजे साखरेचे भाव किलोमागे तब्बल २० ते २५ रुपयांनी वाढत असतील, तर ही केवळ बाजारातील किरकोळ चढ-उताराची बाब मानता येणार नाही. साखरेच्या या दरवाढीमागची कारणे आणि त्याचा प्रत्यक्ष फायदा कोणाला होणार, याचा सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. साखर हा भारतीयांच्या रोजच्या जीवनातील महत्त्वाचा घटक आहे. चहापासून मिठाईपर्यंत आणि घरगुती वापरापासून धार्मिक सणांपर्यंत साखरेचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे साखरेच्या दरातील वाढ थेट सर्वसामान्यांच्या घरगुती अर्थसंकल्पावर परिणाम करते. आगामी काळात गणेशोत्सव, महालक्ष्मी, नवरात्र आणि त्यानंतर दिवाळी असे एकापाठोपाठ एक सण येणार आहेत. हे सर्व सण म्हणजे गोडधोड, प्रसाद, मिठाई आणि पाहुणचाराचे सण. नेमक्या याच काळात साखरेचे दर वाढल्याने उत्सवाचा खर्च आणखी वाढणार आहे. काही काळापूर्वी पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण वाढविण्याच्या धोरणामुळे साखर उद्योगाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. उसापासून साखर तयार करण्याबरोबरच इथेनॉल निर्मितीला चालना मिळाल्याने साखर कारखान्यांचे उत्पन्न वाढेल, उत्पादन व्यवस्थापन अधिक सक्षम होईल आणि त्याचा फायदा अखेरीस ग्राहकांनाही मिळेल, अशी आशा होती. साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्य मिळाले तर शेतकऱ्यांनाही उसाचा योग्य मोबदला मिळेल आणि ग्राहकांनाही स्थिर दरात साखर उपलब्ध होईल, असे समीकरण मांडले जात होते. मात्र प्रत्यक्ष बाजारातील चित्र वेगळेच दिसत असेल तर या धोरणाच्या फायद्याचे वाटप नेमके कुठे होत आहे?, हा प्रश्न उपस्थित होतो. साखरेच्या दरवाढीचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळत असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. शेतकऱ्याला उत्पादनाचा योग्य मोबदला मिळणे ही त्याची गरज आहे, उपकार नव्हेत. मात्र साखरेचा भाव वाढतो आणि त्यातून शेतकऱ्याच्या हातात काहीच अधिक पडत नाही, तर मध्येच व्यापारी, साठेबाज किंवा इतर घटकांनी नफा कमावला, तर ती व्यवस्था ग्राहक आणि शेतकरी दोघांनाही फसवणारी ठरेल. साखरेच्या बाजारपेठेत दरवाढ होताच किरकोळ बाजारातील विक्रेते त्याचा फायदा घेण्यासाठी तत्पर होतात. त्यामुळे सरकारने साखरेच्या वाढलेल्या दरामागील संपूर्ण साखळी तपासली पाहिजे. उत्पादन किती आहे, साठा किती आहे, कारखान्यांकडून साखर कोणत्या दराने बाजारात येत आहे आणि ग्राहकाला ती किती दराने मिळत आहे, याची माहिती पारदर्शकपणे जनतेसमोर आली पाहिजे. कृत्रिम टंचाई निर्माण करून किंवा साठेबाजी करून दर वाढवले जात असतील, तर त्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. सणांचा आनंद हा केवळ श्रीमंतांसाठी असू नये. सर्वसामान्य कुटुंबालाही आपल्या ऐपतीनुसार सण साजरा करता आला पाहिजे. मात्र महागाईने आधीच कंबर मोडलेल्या कुटुंबाच्या ताटातील गोडवा कमी होऊ लागला, तर विकासाच्या आणि आर्थिक प्रगतीच्या दाव्यांचा उपयोग काय? साखर गोड असली तरी तिच्या वाढत्या दराची ही कहानी मात्र सर्वसामान्यांसाठी कडू ठरत आहे. सरकारने साखरेच्या दरवाढीकडे केवळ बाजारातील मागणी-पुरवठ्याचा प्रश्न म्हणून पाहू नये. शेतकरी, साखर कारखानदार, व्यापारी आणि ग्राहक या संपूर्ण व्यवस्थेचा समतोल राखणे आवश्यक आहे. सणासुदीच्या तोंडावर साखरेची दरवाढ नियंत्रणाबाहेर जाऊ नये आणि त्याचा अनाठायी बोजा ग्राहकांच्या खिशावर पडू नये, यासाठी तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. शेतकऱ्याला न्याय मिळावा आणि ग्राहकाच्या घरातील गोडवा टिकावा, एवढीच अपेक्षा. कारण साखर गोड असते; तिची बाजारातील कहानी मात्र सर्वसामान्यांच्या आयुष्यात कडू होऊ नये!

# संत पाचलेगावकर महाराजः उत्सवातून राष्ट्रसेवेची प्रेरणा



दि.२३ ऑगस्ट रोजी संत पाचलेगावकर महाराजांची पुण्यतिथी आहे. त्या निमित्ताने हा लेख पाठवीत आहे. कोणताही उत्सव असो, तो व्यक्तिगत न राहता सामूहिक आणि समर्पित भावनेने साजरा केला, तर तो संबंधित व्यक्तीच्या कार्यकीर्तीचा गौरव ठरतो. आज महाराजांना जाऊन चाळीस वर्षे झाली आहेत. एखाद्या व्यक्तीविषयी किती श्रद्धा व्यक्त करायची, याचे माध्यम म्हणजे अशा स्मृतिदिनांचे आयोजन होय. संपूर्ण अर्पणाची प्रक्रिया हीच खरी श्रद्धांजली अथवा आदरांजली असते. त्याला उत्सवाचे स्वरूप दिले जाते. मानसिकदृष्ट्या परिपूर्ण असलेल्या या प्रक्रियेला लोकनिष्ठा अर्पण होते. त्यामुळे या सर्व प्रक्रिया म्हणजेच उत्सव होय.

या निमित्ताने सामाजिक एकोपा आणि कौटुंबिक स्नेहाची भावना वृद्धिंगत झाली पाहिजे. आपण कोणाची पुण्यतिथी अथवा जयंती साजरी करतो, त्या व्यक्तीचे गुणगान, त्यांच्या कार्याची सामूहिक चर्चा आणि त्यांच्याबद्दल समाजात आदर निर्माण होणे, हेच त्यामागचे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे. आजकाल मात्र त्याचे स्वरूप अगदी वेगळे झाल्याचे निदर्शनास येत आहे. स्वप्रतिष्ठा प्रतिबिंबित करण्यासाठी सामाजिक संवेदनाही प्रकट व्हायला लागते. धार्मिक स्वरूप देऊन अज्ञानाचा आनंद व्यक्त केला जातो. मात्र धर्म म्हणजे काय, हे समजून घेणे आवश्यक आहे. जी धारणा समाजाभिमुख असते, तीच आपला धर्म असला पाहिजे. त्याला सामाजिक स्वरूप देऊन लोकहित साधले, तर समाजहितार्थ कार्य घडते.राष्ट्रसंत पाचलेगावकर महाराजांचे लक्ष केवळ समाजासाठी कार्य करण्यावर नव्हे, तर राष्ट्राभिमान कसा निर्माण होईल, याकडे अधिक होते. त्यांच्या कार्यात अनेक अडथळे आले; परंतु ते दूर करण्यात ते यशस्वी झाले. अनेक ठिकाणी त्यांनी सावरकरांची भेट घेतली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात त्यांना तुरुंगातही जावे लागले. निजामाच्या गाडीत ते बसत असत; परंतु वेळ निजामाची आली की त्याला फटकारणारे संत पाचलेगावकर महाराज होते. त्यांनी त्याची पर्वा केली नाही. राष्ट्र माझे आहे आणि राष्ट्रासाठी मला सर्वस्व करायचे आहे, अशी भावना त्यांच्या मनात होती.

त्यांची कुशलता वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या वाणीतून निघणारा प्रत्येक शब्द राष्ट्र घडविण्याची प्रेरणा देणारा होता, हे विसरता येणार नाही. माणसात ईश्वरी शक्तीचा अंश असून त्याची रक्षा करणे हा महत्त्वाचा भाग आहे, असे त्यांचे मत होते. राष्ट्रासाठी होणाऱ्या क्रिया प्रभावी असाव्या लागतात आणि त्या समाजात निर्माण कराव्या लागतात. श्रद्धेला परोपकाराचे वळण देणे हाच खरा धर्म आहे. त्याला धर्माचे अधिष्ठान प्राप्त होते आणि त्याचा उपयोग राष्ट्रासाठी केला गेला पाहिजे.अनेक अडचणी त्यांच्यासोबत होत्या; तरीही त्यांना पुढे जावे लागले. माणसात ईश्वरी शक्तीचे स्वरूप पाहणे आणि सद्बुद्धीने समर्पित भाव प्रकट करणे म्हणजे राष्ट्रसेवाच होय.आज नांदेड शहरात त्यांच्या नावाने मुक्तेश्वराचे भव्य मंदिर आहे. मात्र त्याचा उपयोग प्रतिष्ठा जोडण्यासाठी होता कामा नये, याची खबरदारी पुढील शिष्यवर्गाने घेतली पाहिजे. तीच महाराजांना खरी श्रद्धांजली ठरेल. श्रीमती गयाबाई दगडूजी लांगे या एका अशिक्षित, वयोवृद्ध महिलेने अतिशय नेटाने आणि समर्पित भावनेने संत पाचलेगावकर महाराजांचे अस्तित्व वसंतनगरमध्ये निर्माण केले. त्यातून मानवसेवा घडली. सामाजिक आणि धार्मिक प्रक्रियेतून समाजातील अनेक प्रश्न सोडविण्यास मदत झाली. मानवकल्याणासाठी या कार्याचा सदुपयोग व्हावा, ही त्यांची तळमळ होती. परंपरेची अनेक कामे झाली; पण माणसे जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या अशिक्षित महिलेने पूर्ण केले.

मानवी मूल्यांचे अधिष्ठान असणे अत्यंत आवश्यक आहे. श्रीमती गयाबाई डांगे यांना महाराजांनी आपली मानसकन्या मानून त्यांच्यावर सर्वाधिकार सोपवले. त्यांनी हे अधिकार स्वतःपुरते न ठेवता स्वतंत्र आणि प्रामाणिक निष्ठावान कार्यकर्त्यांचा समूह निर्माण केला. सुधाकर गोपीनाथ टाक, दत्तोपंत डहाळे, चंद्रभानजी अमृतराव देशमुख, उद्धवराव कनकदंडे, आप्पा रोडे तसेच सर्व बंधू-भगिनी आणि त्यावेळच्या वसंतनगर हाउसिंग सोसायटीचे प्रमुख गोविंदराव धर्माधिकारी, गोविंदराव चिखलीकर, भुजंगराव किनाळकर, अनंत लाटकर यांनी मोलाचे सहकार्य करून त्या बाईच्या मागे उभे राहिले.त्यातून मुक्तेश्वराची स्थापना झाली आणि स्वतंत्र ट्रस्ट निर्माण करण्यात आला. त्याचे प्रमुख सुधाकर टाक यांनी कायद्याचे सर्व नियम पाळून राष्ट्रसेवा करण्यासाठी हा ट्रस्ट निर्माण केला. ट्रस्टची नोंदणीही कायदेशीर पद्धतीने करण्यात आली. संत पाचलेगावकर महाराजांकडून स्फूर्ती घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न आजही होत आहे. म्हणूनच सर्व संचालक आणि भक्तांद्वारे विविध धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आज समाजाला अशा कार्याची गरज आहे.चांगला आदर्श समाजात निर्माण झाला पाहिजे. कुठेही स्वार्थ न ठेवता त्यागाची भावना या कार्यातून निर्माण होऊ शकते. ही मौलिक देणगी ट्रस्टच्या माध्यमातून निर्माण करण्याचा संकल्प घेतला आहे, ही अभिमानाची बाब आहे. वेळप्रसंगी स्वतःला विसरून राष्ट्रीय कार्यासाठी समर्पण करणारे भक्त संत पाचलेगावकर महाराजांनी निर्माण केले. महाराजांनी त्याबरोबर मुक्तेश्वर दलही निर्माण केले होते. पुढे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात विलीन झाले.

एकूणच राष्ट्रनिर्माण, राष्ट्रविकास आणि राष्ट्रासाठी होणाऱ्या विकासकार्यात योगदान देणाऱ्या थोर राष्ट्रपुरुषांची जयंती व पुण्यतिथी साजरी केली जाते. आज दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी श्रावण शुद्ध एकादशीच्या निमित्ताने सर्व भक्तांना प्रेरणा मिळते. स्वतःचे संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या महाराजांबद्दल आदर वाटतो. मात्र त्यांचा कोणत्याही सरकारी यंत्रणेद्वारे उचित गौरव होत नाही, याचे दुःख आणि खंत माझ्या मनात आहे.महाराजांच्या राजकीय, सामाजिक आणि राष्ट्रहिताच्या कार्याला सातत्याने गती मिळत गेली. हीच खरी राष्ट्रसेवा आहे आणि हीच खरी जयंती व पुण्यतिथी आहे, असे माझे मत आहे.संत पाचलेगावकर हे एक आदर्श नाव आहे. संत पाचलेगावकर हे चैतन्याचे नाव आहे. संत पाचलेगावकर हे उखळीकर राष्ट्रसंताचे नाव आहे. पुढील पिढीने त्यांचा उपयोग केवळ धर्मासाठी नव्हे, तर राष्ट्रासाठी, उत्साहासाठी आणि देशकार्यासाठी प्रेरणा म्हणून केला पाहिजे. देशकार्यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य महाराजांनी केले, हे विसरता येणार नाही.प्रत्येकाने आपल्या राष्ट्रकार्यासाठी एक मूल दान करण्याचे आवाहन ट्रस्टच्या माध्यमातून केले जाते. मीही विनंती करतो की, आपल्या कुटुंबात दोन मुले असतील, तर एक मूल राष्ट्रसेवेसाठी द्यावे. महाराजांच्या नावाचा उपयोग करून लोकांनी स्वार्थाच्या बाजारात जाणार नाही, याची काळजी सर्व ट्रस्टींनी घेतली पाहिजे. त्यांच्या नावाचा दुरुपयोग होता कामा नये.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

आपल्या नावामागे अनेक लोक पाचलेगावकर हे नाव लावतात. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असे प्रकार चालले आहेत. हे दुर्दैव म्हणावे लागेल. स्वतःच्या नावामागे पाचलेगावकर हे आडनाव लावणे नव्हे, तर शिष्य म्हणून त्यांचा विचार आणि कार्य पुढे नेणे महत्त्वाचे आहे. पाचलेगावकर महाराजांचा अवतार समजून घेणे आणि स्वार्थी व भामट्या प्रवृत्तींपासून सावध राहणे, हेच महत्त्वाचे आहे.येथील मुक्तेश्वर आश्रमाने समाजसेवेचा संकल्प जपला आहे, हे सत्य आहे. प्रत्येकाने आत्मपरीक्षण करणे महत्त्वाचे आहे. सातत्याने सेवा ज्या ठिकाणी आजही जिवंत आहे, त्यामुळेच मोठा प्रतिसाद मिळतो. आजही शेकडो स्त्री-पुरुष रक्तदानासारखे महत्त्वाचे दान करतात. एका बाजूला शिवशंकराला दही-दुधाचा अभिषेक, तर दुसरीकडे परोपकारासाठी रक्तदान, अशी महाराजांनी घालून दिलेली परंपरा आजही कायम ठेवण्यात आली आहे.म्हणून ट्रस्टचे समाजावर अनेक उपकार आहेत, असे मी मानतो. ट्रस्टचे अनेक संचालक महत्त्वपूर्ण वेळ देऊन सेवेचा भाग निर्माण करतात. या कार्याला समाजानेही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे.एका प्रसंगी महाराज आपल्या भाषणात म्हणाले होते, मी गेल्यावरसुद्धा मी मुक्तेश्वर आश्रम नांदेडमध्येच राहील. त्यावेळी सर्वांनी हात उचलून आणि टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले होते. येथे आस्तिकच नव्हे, तर नास्तिक व्यक्तींनाही महाराजांविषयी आदर वाटत असे. आजही त्यांना मानणारा समूह मोठ्या प्रमाणात आहे. तीच सेवा ट्रस्टच्या माध्यमातून सुरू आहे, हे विशेष म्हणावे लागेल.

आश्रमात आर्थिक व्यवहारात पारदर्शकता राखली जाते. ज्यांना कोणाला देणगी द्यायची असेल त्यांनी ती दानपात्रातच टाकावी किंवा पावती घेतल्याशिवाय परस्पर देणगी देऊ नये. वस्तूंची देणगी देतानाही त्याची नोंद ठेवली जाते. हे कार्य काटेकोरपणे आश्रमात घडते. गरज पडल्यास सरकारला, आपतग्रस्तांना, भूकंपग्रस्तांना, गरीब शेतकऱ्यांना तसेच निराधार लेकरांना मदतीचा हात ट्रस्ट देत असतो. ही महत्त्वपूर्ण बाब वाखाणण्यासारखी असून, हेच राष्ट्रप्रेम आहे, असे माझे मत आहे.अनेक राजकीय नेत्यांनी निवडणूक कार्यक्रमात संत पाचलेगावकर महाराजांच्या योगदानाचा उल्लेख केला आहे. परंतु त्यांचे उचित स्मारक उभे केले गेले नाही, याचीही मला खंत आहे. हे का होत नाही, ही भावना माझ्या मनात आहे. पुढे आपल्या आश्रमातर्फेयाबाबतचा प्रस्ताव संबंधित राजकीय नेत्यांना द्यावा, अशी माझी विनंती आहे.संत पाचलेगावकर महाराजांनी श्रमदानातून या परिसरात चार-पाच रस्ते तयार केले होते. त्यावेळी श्रीमती कुसुमताई चव्हाण आणि श्रीमती अमिताताई चव्हाण स्वतः सहभागी झाल्या होत्या. त्यांनीही आपल्या भाषणातून संत पाचलेगावकर महाराजांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी अनुष्ठान पूर्ण केले. ही भावना आजही समाजात रुजलेली आहे. त्यानंतर महानगरपालिकेने तेथे सिमेंटचे रस्ते तयार केले आहेत.

म्हणून आमची नांदेड महानगरपालिकेच्या महापौर आणि नगरसेवकांना विनंती आहे की, महादेव गल्ली, मुक्तेश्वर आश्रम आणि आनंदनगर भागातील मार्गाला संत पाचलेगावकर महाराज मुक्तेश्वर आश्रम मार्ग असे नामकरण करावे. त्यातून त्यांचा उचित गौरव होईल, असे आमचे मत आहे. याबाबतचे निवेदनही संबंधितांना आम्ही दिले आहे.संत पाचलेगावकर महाराजांची पुण्यतिथी केवळ धार्मिक उत्सव न राहता राष्ट्रसेवा, समाजसेवा, परोपकार, त्याग, सामाजिक एकोपा आणि मानवी मूल्यांची प्रेरणा देणारी ठरली पाहिजे. त्यांच्या नावाचा उपयोग स्वप्रतिष्ठेसाठी न होता समाजहितासाठी झाला, तरच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल. महाराजांनी दिलेली राष्ट्रसेवेची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच आजच्या पिढीची खरी जबाबदारी आहे.


### जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण,६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०७६/२०२६
राधीका व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. राधीका भ्र.महेश मुदीराज वय : ३९ वर्षे, धंदा : घरकाम, २. ऋषीका पि.महेश मुदीराज वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण अ.पा.क.आई अर्जदार क्र.१, ३. वैष्णव पि.महेश मुदीराज वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र.१ सर्व रा.दिलीपसिंघ कॉलनी, वजिराबाद, नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत महेश पि.सायलु मुदीराज उर्फ गुडसेवार यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ३ हे त्यांचे अपत्ये आहेत. त्यांचा मृत्यू दिनांक १२/१०/२०१४ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत महेश पि.सायलु मुदीराज उर्फ गुडसेवार यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/ सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/- आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक स्वाक्षरित/-
६ वे सह दिवाणी न्यायालय सहायक अधिक्षक
क.स्तर,नांदेड दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



### जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण,६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२३४/२०२६
गोपाल विरुद्ध निरंक

अर्जदार : १. गोपाल पि.नारायण सिलवेरी वय : ५६ वर्षे, धंदा : व्यवसाय, रा.घर क्र.२-१-२०७, मिल एरिया,नल्लागुट्टा चाळ,नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत सरस्वती भ्र.नारायण चिलवेरी उर्फ शिलवेरी यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार हा त्यांचा मुलगा आहे. त्यांचा मृत्यू दिनांक १६/१०/२०१३ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत सरस्वती भ्र.नारायण चिलवेरी उर्फ शिलवेरी यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक २८/०९/२०२६ पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/ सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/- आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक स्वाक्षरित/-
६ वे सह दिवाणी न्यायालय सहायक अधिक्षक
क.स्तर,नांदेड दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



### जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
दिवाणी किरकोळ अर्ज (आर.जे.ई) क्र.१२३१/२०२६
अशोक व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. अशोक पि.आनंदराव पुपलवाड वय : ५४ वर्षे, धंदा : मजुरी, २. गणेश पि.अशोकराव पुपलवाड वय : २७ वर्षे, धंदा : शिक्षण, ३. महेश अशोकराव पुपलवाड वय : २१ वर्षे, धंदा : शिक्षण वरील सर्व रा.वैष्णवी नगर, मु.पो.पावडेवाडी तरोडा (बु.), नांदेड, ता.जि.नांदेड मो.क्र.९३७०४७७६३

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

मयत : कलम २ व ३ बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे मयत प्रणिता भ्र.अशोक पुपलवाड यांचे अर्जदार क्र.१ हे पती, अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ हा मुलगा आहे. मयत प्रणिता भ्र.अशोक पुपलवाड हे दि.१६.०७.२०२६ रोजी मृत्यू पावलेले आहेत.

वर नमुद अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदारांनी अर्जात कथन केले आहे. अर्जदारांनी मा.न्यायालयात अर्जदारांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दि.०९.१०.२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/- आदेशावरुन
कनिष्ठ लिपीक स्वाक्षरित/-
४ थे सह दि.न्या. सहाय्यक अधिक्षक
क.स्तर,नांदेड दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# देगलूरातील सरस्वती इंग्लिश स्कूलची पालक समिती नियमबाह्य?

देगलूर/प्रतिनिधी-सरस्वती विद्यालयातील पालक समितीच्या स्थापनेवरून पालकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, नुकत्याच झालेल्या बैठकीत समितीची निवड प्रक्रिया आणि त्यातील काही सदस्यांच्या समावेशावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची देगलूर गटशिक्षणाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करावी, अशी मागणी पालकवर्गातून होत आहे.

सरस्वती विद्यालयातील पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची पालक समिती गठीत करण्यासाठी शहरातील एका मंगल कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, या बैठकीत संस्थाचालकांनी आपल्या पसंतीचे शाळेतील शिक्षकच पालक प्रतिनिधी म्हणून निवडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप पालकांकडून करण्यात आला. त्यामुळे बैठकीत काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पालक समितीमध्ये पालक प्रतिनिधींना योग्य पद्धतीने संधी देण्याऐवजी शाळेतील शिक्षकांचा समावेश करण्यात आल्याने पालकांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर संस्थाचालकांनी आपल्या मर्जीनुसार काही सदस्यांची निवड केल्याचा आरोपही करण्यात येत आहे. यानंतर आज शाळेत घेण्यात आलेल्या बैठकीत पालक समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी शिवकुमार प्रभाकरराव मरतुळे (शाळेचे मुख्याध्यापक), उपाध्यक्षपदी सय्यद गौस सय्यद अहमद (पालक प्रतिनिधी), सचिवपदी बालाजी जनार्दन दिंडगिरे (शाळेतील शिक्षक) यांची निवड करण्यात आली. तर सहसचिवपदी राम चांदोबा गवलवाड आणि शेख शमीम हबीब या पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. मात्र, शाळेचे मुख्याध्यापक अध्यक्ष आणि शाळेतील शिक्षक सचिव असलेल्या या समितीची रचना शासनाच्या नियमांनुसार आहे का? असा थेट सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. पालक समितीमध्ये पालक प्रतिनिधींचे स्थान आणि निवड प्रक्रिया याबाबत शासनाने निश्चित केलेल्या नियमांचे पालन झाले आहे का, याची पडताळणी होणे गरजेचे असून शाळेत शिकविणाऱ्या पालकांना पालकवर्गातून प्रतिनिधित्व देऊन समितीत स्थान देऊ नये तसेच समितीच्या अध्यक्षपदी पालकांची निवड करून समितीच्या सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापकांची निवड करावी अशी मागणी पालक वर्गातून होत आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी चौकशी करून सत्य बाहेर काढावे! सरस्वती विद्यालयातील पालक समितीची संपूर्ण निवड प्रक्रिया, सदस्यांची पात्रता, पालक प्रतिनिधींची निवड आणि पदाधिकाऱ्यांची नियुक्ती यांची देगलूर गटशिक्षणाधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे चौकशी करावी. शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार समितीची स्थापना झाली नसल्याचे चौकशीत स्पष्ट झाल्यास सदर समिती बरखास्त करून स्वतः पीठासीन अधिकारी म्हणून नियमाप्रमाणे नव्याने समिती गठीत करण्याची कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.




कलामंदिर ते सोमेश कॉलनीकडे जाणारा रस्ता प्रशासनाने बॅरिकेटस लावून बंद केल्याने वाहनचालकांना त्रास होत असून कलामंदिर चौकात वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे.

## अधिसुचना (कलम १९)

क्र.२०२३/आरबी/डेस्क-३/भुसं/सिआर-२९
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड
दिनांक-२३/०७/२०२६

### भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३

जा.क्र.२०२३/भूसं/नि.प्र.प्र./खंबाळा किनवट जमीन/सिआर.१० ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, क्र.२०२३/भूसं/नि.प्र.प्र./खंबाळा किनवट जमीन/सिआर.१० अन्वये **अधिसुचना गुरुवार ते बुधवार, ०८-१४ फेब्रुवारी २०२४ माघ १९-२५ शके १९४५ पृष्ठ क्र.१६७ वर भाग-१ पुरवणी व शुध्दीपत्रक गुरुवार ते बुधवार, ३०-०५ ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ कार्तीक ८-१४ शके १९४७ पृष्ठ क्र.२४८५ वर भाग-१ विभागीय पुरवणी** अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसुची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी **कार्यकारी अभियंता निम्न पैनगंगा प्रकल्प विभाग यवतमाळ** या विभागाच्या खर्चाने करण्याची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, नांदेड (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. याबाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसुची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणुन निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी यास **सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी किनवट** पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**
**संपादीत करावयाच्या जमिनीचे वर्णन**
**मौजे खंबाळा ता.किनवट जि.नांदेड**

| अ.क्र. | भुमापन क्रमांक किंवा गट क्रमांक | क्षेत्रफळ (हे.आर.मध्ये) |
|---|---|---|
| १. | २१ | १.१९ |
| २. | २१ | १.१९ |
| ३. | २२ | १.२० |
| ४. | २२ | ०.६२ |
| ५. | २३ | १.६७ |
| ६. | २३ | ०.८० |
| ७. | २३/१ | १.३० |
| ८. | २३/२ | १.२६ |
| ९. | २५/१ | २.०० |
| १०. | ३२ | ०.५६ |
| ११. | ३३ | ०.६८ |
| १२. | ३८ | १.०६ |
| १३. | ४१/१ | २.०० |
| १४. | ४७ | २.०२ |
| १५. | ५२ | २.२८ |
| १६. | ६१ | १.१३ |
| १७. | ६१/१ | १.८६ |
| १८. | ६३ | १.०० |
| १९. | ६३ | १.०० |
| २०. | ६३ | १.४१ |
| २१. | ६३ | १.५२ |
| २२. | ७० | ०.६० |
| २३. | ७० | ०.६० |
| २४. | ७० | १.४० |
| २५. | ७३ | २.४२ |
| २६. | ७६ | १.८३ |
| २७. | ७६/१ | १.३९ |
| २८. | ८२/१ | १.६० |
| २९. | ८३ | ३.५८ |
| ३०. | ८३/१ | २.०१ |
| ३१. | ८३/१ | १.२९ |
| ३२. | ८६/१ | १.८२ |
| ३३. | ८७/१ | १.६४ |
| ३४. | ८७/१ | १.६० |
| ३५. | ९१ | ०.८१ |
| ३६. | ९१ | ०.४० |
| ३७. | ९१ | ०.८१ |
| ३८. | ९१/३ | ०.८० |
| ३९. | ९१/४ | ०.४० |
| ४०. | ९१/४ | ०.४० |
| ४१. | ९१/४ | १.२२ |
| ४२. | ९६/१ | ०.६६ |
| ४३. | ९६/१ | ०.८० |
| ४४. | ९६/१ | ०.८० |
| ४५. | ९६/१ | ०.८० |
| ४६. | ९८ | १.४१ |
| ४७. | ९८ | ०.८० |
| ४८. | ९८/१ | ०.८२ |
| ४९. | ९८/१ | १.२० |
| ५०. | १०० | २.२१ |
| ५१. | १०० | ०.४० |
| ५२. | १००/२ | २.०२ |
| ५३. | १००/३ | १.१८ |
| ५४. | १००/३ | १.३३ |
| ५४. | १००/३ | १.२१ |
| ५५. | १०१ | ०.९६ |
| ५६. | १०१ | ०.८४ |
| ५७. | १०१ | १.०० |
| ५८. | १०१/१ | १.१४ |
| ५९. | १०१/१ | १.१० |
| ६०. | १०१/१ | ०.६० |
| ६१. | १०१/२ | २.०२ |
| | **एकुण क्षेत्रफळ** | **७७.६७** |

**अनुसूची - दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नावः- भुसंपादन प्रस्ताव-निम्न पैनगंगा प्रकल्प ता.घाटंजी जि.यवतमाळचे बुडीत क्षेत्रासाठी लागणाऱ्या जमीनीचा भुसंपादन प्रस्ताव
प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :- भुसंपादन प्रस्ताव- निम्न पैनगंगा प्रकल्प ता. घाटंजी जि.यवतमाळ
बुडीत क्षेत्रासाठी लागणाऱ्या जमिनीचा भूसंपादन प्रस्ताव समाजाला होणारा लाभ :- जलसिंचन

**अनुसूची - तीन**
**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**
**मौजे खंबाळा ता.किनवट जि.नांदेड**

| अ.क्र. | भुमापन क्रमांक किंवा गट क्र. | क्षेत्रफळ (हे.आर.मध्ये) |
|---|---|---|
| - | - लागू नाही - | - |

**अनुसूची - चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**
**लागू नाही**

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे निरीक्षण उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट येथील कार्यालयामध्ये करता येईल.

दिनांक :- /०७/२०२६
ठिकाण :- नांदेड

स्वाक्षरित/-
**जिल्हाधिकारी नांदेड**

जिमाका/नां/जाहिरात/७६/२०२६/२०२७

# आ.बाबुराव कदम कोहळीकरांच्या पत्राचा टोलमाफीसाठी गैरवापर?

## बनावट स्वाक्षरीचा संशय;चौकशीची मागणी



हदगाव/प्रतिनिधी-लोकप्रतिनिधींच्या नावाचा आणि स्वाक्षरीचा कथित गैरवापर करून राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाक्यांवर काही वाहनांना टोलमाफी मिळवून देण्याचा प्रकार नांदेड जिल्ह्यात समोर आल्याने खळबळ उडाली आहे. हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.बाबूराव कदम कोहळीकर यांच्या नावाने व कथित बनावट स्वाक्षरीचा वापर करून काही पत्रे तयार करण्यात आली आणि त्या पत्रांच्या आधारे विविध टोलनाक्यांवर वाहनांना टोल न भरता प्रवेश दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

आ.बाबुराव कोहळीकर यांच्या नावाने आणि स्वाक्षरीसह तयार करण्यात आलेली काही पत्रे त्यांच्या कार्यालयातून जारी करण्यात आलेली नसल्याचे सांगण्यात येत आहे. या पत्रांचा वापर काही वाहनांना टोलमाफी मिळवून देण्यासाठी करण्यात आल्याची बाब समोर आल्यानंतर या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. सुमारे दोन महिन्यांपूर्वी संबंधित प्रकल्प संचालकांकडे या प्रकाराबाबत चौकशीची मागणी करणारे पत्र देण्यात आल्याची माहिती आहे.सामाजिक कारणांसाठी असलेल्या सवलतीचा कथित गैरवापर राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाक्यांवर नियमांनुसार काही विशेष परिस्थितीत टोल सवलत किंवा टोलमाफीची तरतूद असते. गंभीर आजाराचे रुग्ण, रुग्णवाहिका तसेच विशिष्ट सामाजिक व मानवीय कारणांसाठी नियमानुसार सुविधा दिली जाऊ शकते. मात्र, याच सामाजिक भावनेशी संबंधित व्यवस्थेचा कथित गैरवापर करून काही व्यक्तींनी आमदारांच्या नावाने पत्रे तयार केली आणि त्यांच्या आधारे खासगी वाहनांना टोलमाफी मिळवून देण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.या संपूर्ण प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे लोकप्रतिनिधींच्या नावाचा व स्वाक्षरीचा कथित गैरवापर आमदारांच्या अधिकृत पत्रासारखे दिसणारे दस्तऐवज टोल व्यवस्थापनाकडे सादर करण्यात आले होते का, त्यावरून प्रत्यक्षात किती वाहनांना टोलमाफी मिळाली आणि ही पत्रे कोणी तयार केली, याचा तपास होणे आवश्यक आहे. जर चौकशीत संबंधित पत्रे बनावट असल्याचे निष्पन्न झाले, तर ती कोणी तयार केली, कोणी टोलनाक्यांवर सादर केली, कोणत्या वाहनांना त्याचा लाभ मिळाला आणि त्यामुळे शासनाच्या महसुलाचे किती नुकसान झाले, या सर्व बाबींचा तपास करणे गरजेचे ठरणार आहे.केवळ एखाद्या लोकप्रतिनिधीच्या पत्राच्या आधारे खासगी वाहनाला टोलमाफी देण्याचा अधिकार संबंधित टोल व्यवस्थापनाला आहे का?, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. टोल माफी संदर्भातील शासन व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या निर्धारित नियमांनुसारच वाहनांना सवलत देता येते. त्यामुळे नियमांच्या बाहेर जाऊन केवळ एखाद्या पत्राच्या आधारे टोलमाफी देण्यात आली असल्यास संबंधित टोल व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीचीही चौकशी होणे आवश्यक आहे.या प्रकरणाचा खरा उलगडा करण्यासाठी संबंधित टोलनाक्यांवरील सीसीटीव्ही फुटेज, टोलमाफीची नोंदवही, सादर करण्यात आलेल्या पत्रांच्या प्रती, संबंधित वाहनांचे क्रमांक तसेच पत्रे सादर करणाऱ्या व्यक्तींची माहिती तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे. तपासातून आमदारांच्या नावाने अशा प्रकारची किती पत्रे तयार झाली, किती वाहनांना त्याचा लाभ मिळाला आणि या संपूर्ण प्रकारामागे कोणकोणत्या व्यक्तींची भूमिका होती, हे स्पष्ट होऊ शकते.

# स्वातंत्र्याला ८० वर्षे;तरी सातघरीला रस्ता नाही!

## दीड-दोन किलोमीटरची खडतर पायपीट!

सरफराज दोसानी



माहूर : देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण झाली असून विकासाच्या घोषणा, कोट्यवधींच्या योजनांचे दावे आणि ग्रामीण विकासाचे गाजावाजा सुरू असतानाच माहूर तालुक्यातील सातघरी गावातील नागरिक मात्र आजही रस्त्यासाठी पायपीट करत आहेत. गावापर्यंत वाहन पोहोचेल असा साधा रस्ता नसल्याने नागरिकांना सुमारे दीड ते दोन किलोमीटरची खडतर वाट तुडवत मुख्य रस्त्यावर यावे लागते. त्यामुळे स्वातंत्र्याच्या अमृतकाळातही सातघरीवासीयांच्या नशिबी मात्र विकासाऐवजी दगडधोंडे आणि चिखलाची वाट आली आहे.

सातघरी परिसरात बहुसंख्य बंजारा समाजातील कुटुंबे वास्तव्यास आहेत. मात्र मूलभूत सुविधा देण्याच्या सरकारी दाव्यांना ही वस्ती जणू अपवादच ठरली आहे. वस्तीपर्यंत वाहन रस्ता नसल्याने शालेय विद्यार्थी, महिला, वृद्ध आणि आजारी नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांना दररोज याच खडतर वाटेने शाळेत जावे लागते. एखादा नागरिक आजारी पडल्यास रुग्णवाहिका व अन्य वाहन वस्तीपर्यंत पोहोचत नसल्याने रुग्णाला खांद्यावर, झोळीत किंवा अन्य साधनाने मुख्य रस्त्यापर्यंत आणण्याची वेळ येते.

**पावसाळ्यात वाट नव्हे, संकटाचा मार्ग**

पावसाळ्यात या पायवाटेची अवस्था आणखी बिकट होते. चिखल, घसरडी वाट, दगडधोंडे आणि नाल्यांमधून मार्ग काढताना नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालय गाठण्यासाठी लागणारा वेळ वाढतो आणि गंभीर प्रसंगी रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

सातघरीला रस्ता मिळावा यासाठी ग्रामपंचायतीने तब्बल २४ मार्च २०२३ रोजी ठराव केला. शेकापूर-केरोळी अंतर्गत मौजे सातघरीकडे जाणाऱ्या केरोळी ते सातघरी पांदन रस्त्याला ग्रामीण मार्गाचा दर्जा देऊन तो विकसित करण्याची मागणी करण्यात आली होती. सुमारे दीड ते दोन किलोमीटरच्या या मार्गाचा ग्रामीण मार्गात समावेश करण्यासाठी ग्रामपंचायतीने अधिकृत ठरावही केला.यानंतर १० जानेवारी रोजी आ.भीमराव केराम यांनीही कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, भोकर यांना पत्र देऊन केरोळी ते सातघरी पांदन रस्त्याचा ग्रामीण मार्गात समावेश करून तो विकसित करण्याची सूचना केली.मात्र प्रत्येक्षात अजून रस्त्याचा प्रस्ताव कागदावरच आहे. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने सातघरीची प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्याच्या कामाला मंजुरी देत निधी उपलब्ध करून द्यावा. अन्यथा स्वातंत्र्याला ८० वर्षे झाली, तरी रस्ता नाही हा प्रश्न सातघरीपुरता न राहता ग्रामीण विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरणार आहे.

# जिव्हाळा संस्थेचा उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्काराने सन्मान



उमरखेड/प्रतिनिधी-स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे जिव्हाळा संस्थेला महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट कार्य गौरव पुरस्कार-२०२६ ने सन्मानित करण्यात आले.

मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते हा पुरस्कार संस्थेचे अध्यक्ष अतुल मादावार यांनी स्वीकारला. यावेळी जिल्हाधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, आ.दुष्यंत चतुर्वेदी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गेल्या १५ वर्षांपासून जिव्हाळा संस्था महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, जलसंधारण, आपत्ती व्यवस्थापन आदी क्षेत्रात कार्यरत आहे. पुराच्या काळात हजारो कुटुंबांना मदत, तर जिल्ह्यातील २२५ गरजू मुलींना सीएसआर निधीतून शिष्यवृत्ती देऊन संस्थेने उल्लेखनीय कार्य केले आहे. हा पुरस्कार कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि सहकाऱ्यांच्या योगदानाचा गौरव असून समाजसेवेची जबाबदारी अधिक वाढली असल्याची भावना अध्यक्ष अतुल मादावार यांनी व्यक्त केली. यावेळी धनराज राऊत, गजानन श्रीरामांजवार, रुद्राक्ष मादावार, रोहित अलमुलवार उपस्थित होते.

पान १ वरुन

### 'छात्रों की गूंज'...

कार्यकर्त्यांवरच कारवाई केल्याचा आरोप करत त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.वडेट्टीवार यांच्या म्हणण्यानुसार, पोलिसांच्या लाठीमारात काँग्रेसचे दोन कार्यकर्ते जखमी झाले. न्याय आणि विद्यार्थ्यांच्या संरक्षणासाठी गेलेल्या कार्यकर्त्यांवरच कारवाई होणे चुकीचे असल्याचे त्यांनी म्हटले.शिवानी वडेट्टीवार यांनीही संबंधित विद्यार्थिनीवर दबाव आणल्याचा आरोप केला. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही.

# पत्रकार रविंद्रसिंग मोदी यांना वादळवारा पुरस्कार जाहीर



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड येथील सेवाभावी व्यक्तिमत्व, पत्रकार स. रविंद्रसिंघ मोदी यांना सेवभावी संस्था व मुजीबभाई मित्र मंडळ, नांदेड तर्फे वादळवारा-२०२६ पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. येत्या दि. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी, स्व. शंकररावजी चव्हाण सभागृह नांदेड येथे लोकशाहिर, भीमकवि वामनदादा कर्डक यांच्या जयंती निमित्त हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सामाजिक क्षेत्रात कार्यरत संस्था मुजीबभाई मित्र मंडळ तर्फे विविध क्षेत्रात कार्यरत आणी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंचा वादळवारा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो. यावर्षी वामानदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त दि.२३ ऑगस्ट रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. वरील कार्यक्रमाचे उद्घाटन भदंत पंय्याबोधी थेरो, नांदेड भूषण संतबाबा बलविंदरसिंघजी कारसेवावाले, हजरत मौलाना मुफ़्ती मोहम्मद अयूब कासमी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक डॉ नीलाभ रोहन, महापालिका आयुक्त डॉ महेश डोईफोडे यांच्यासह इतर मान्यंवर उपस्थित राहणार आहेत. वरील कार्यक्रमात विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वांचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येणार आहे. पत्रकार रविंद्रसिंघ मोदी हे मागील तीन दशकाहुन अधिक काळ बहुभाषिय पत्रकारितेत स्थापित आहेत. तसेच सामाजिक क्षेत्रात त्यांचे भरपूर योगदान आहे. त्यांना पुरस्कार घोषित झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# 'समरगंध' कविता संग्रहाचे रविवारी प्रकाशन

नांदेड/प्रतिनिधी-कवयित्री अंजली कानिंदे यांच्या पहिल्या मराठी कवितासंग्रह समरगंधचे प्रकाशन आज, रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल विसावा पॅलेस, शिवाजीनगर, नांदेड येथे होत आहे. अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य तथा ज्येष्ठ साहित्यिक देवीदास फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार आहे.

मराठवाडा साहित्य परिषद, शाखा नांदेड व इसाप प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास डॉ. वृषालीताई किन्हाळकर, प्रसिद्ध कवयित्री व लेखिका यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच अंजली कानिंदे यांचे बाबा डॉ. रेणूराव कानिंदे व आई सौ. चंद्रप्रभा कानिंदे यांच्या हस्ते समरगंधचे प्रकाशन होणार आहे. प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा. डॉ. पुरुषोत्तमभाऊ धोंडगे, ॲड. मुक्तेश्वरभाऊ धोंडगे व प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांची उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर व श्रीनिवास मस्के (प्रसिद्ध कवी) असून निवेदन प्रा. धाराशिव शिराळे करणार आहेत. या प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमी, कवी, लेखक, वाचक व रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# संत पाचलेगावकर महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदानासह विविध उपक्रम



नांदेड/प्रतिनिधी-श्री संत पाचलेगावकर महाराज यांच्या ४० व्या पुण्यतिथीनिमित्त मुक्तेश्वर आश्रम, वसंतनगर, नांदेड येथे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या कार्यक्रमात रक्तदान शिबिर, मधुमेह तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर तसेच व्यसनमुक्ती कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी गुरुपादुकांचा अभिषेक अध्यक्ष सुधाकर टाक यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यानंतर सामूहिक उपासना व सो.शिवकन्या देशमुख यांच्या गुरुदर्शनाचे वाचन होईल. यानंतर व्यसनमुक्तीचा कार्यक्रम व शपथग्रहण सोहळा ब्रह्मकुमारी बी.के. शिवप्रिया बहन यांच्या हस्ते पार पडणार आहे.नेत्रचिकित्सा व मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन लायन्स क्लब नांदेड मिटटाऊन यांच्या वतीने करण्यात आले असून, हे शिबिर सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता पिंडदानाचा कार्यक्रम रमेश कनकदंडे यांच्या हस्ते होणार असून, त्यानंतर दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संत पाचलेगावकर महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या उपक्रमातून धार्मिक श्रद्धेसोबतच आरोग्य, व्यसनमुक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात येणार आहे. नागरिकांनी या विविध उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुक्तेश्वर आश्रम, वसंतनगर, नांदेडचे अध्यक्ष सुधाकरराव टाक यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती के.बी.सोनवणे)
दिवाणी किरकोळ अर्ज (आर.जे.ई) क्र.१२२१/२०२६
भारताबाई व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. भारताबाई भ्र.चांदु उर्फ चांदोजी पावडे वय ७० वर्षे, धंदा घरकाम, २. संदीप पि.चांदोजी पावडे वय ३९ वर्षे, धंदा मजुरी, ३. कंठेश्वर पि.चांदोजी पावडे वय ३६ वर्षे, धंदा मजुरी, वरील सर्व रा.पुयणी, ता.जि.नांदेड, ४. सोनाली भ्र.हनुमंत सोळंके (सोनाली पि.चांदोजी पावडे) वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा.चांगेफळ, पोस्ट कावळगाव, ता.पूर्णा, जि.परभणी.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

मयत : कलम २ व ३ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे मयत चांदोजी पि.नामदेवराव पावडे यांचे अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ हा मुलगा असून अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे. मयत चांदोजी पि.नामदेवराव पावडे हे दि.१४.९.२०२३ रोजी मृत्यू पावलेले आहेत.

वर नमुद अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदारांनी अर्जात कथन केले आहे. अर्जदारांनी मा. न्यायालयात अर्जदारांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दि.०७.१०.२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| कनिष्ठ लिपीक | स्वाक्षरित/- |
| ४ थे सह दि.न्या. | सहाय्यक अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# भाजी मंडईतील सार्वजनिक शौचालय उभारण्याची मागणी

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील अहिल्याबाई होळकर भाजी मंडईतील गाळा क्रमांक ६ व ७ परिसराची दुरवस्था दूर करून त्या ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची उभारणी करावी, अशी मागणी सेवा जनशक्ती पार्टीचे युवा आघाडी तालुका प्रमुख साईनाथ भगवानराव मळगे यांनी कंधार नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अहिल्याबाई होळकर भाजी मंडई ही कंधार शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांसाठी महत्त्वाची बाजारपेठ असून, तालुक्यातील विविध गावांमधून मोठ्या प्रमाणात शेतकरी व नागरिक येथे भाजीपाला खरेदी-विक्रीसाठी येतात. मात्र मंडईतील गाळा क्रमांक ६ व ७ परिसरातील शेड व इतर बांधकाम जीर्ण अवस्थेत असून, आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले आहे.या ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे काही नागरिकांकडून परिसरात लघुशंका केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी व व्यापाऱ्यांची गैरसोय होत असल्याचे मळगे यांनी निदर्शनास आणून दिले. नगरपरिषदेने केवळ तात्पुरती स्वच्छता न करता या समस्येवर कायमस्वरूपी व नियोजनबद्ध उपाययोजना करावी. गाळा क्रमांक ६ व ७ ची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी तसेच नागरिकांच्या सोयीसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि मूलभूत सुविधांनी युक्त सार्वजनिक शौचालयाची उभारणी करावी, अशी ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

CHANGE IN NAME

My (old name) is **CHIKHALIKAR PRATAPRAO** which now I am, changing as (new name) **PRATAPRAO GOVINDRAO CHIKHALIKAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**PRATAPRAO GOVINDRAO CHIKHALIKAR**
R/o H.no.108, At Post Chikhali
Taluka Kandhar Nanded-431714
M. No.9923190009

पान १ वरुन

### यात्रा लाखों भाविकांची;...

धार्मिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची तातडीने व्यापक समन्वय बैठक घेऊन ठोस नियोजन जाहिर करावे, अशी मागणी भाविक आणि माहूरकरांकडून होत आहे. लाखो भाविकांचा विश्वास असलेल्या माहूरच्या यात्रेचे महत्त्व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कमी होणार नाही ना? हा प्रश्न आता ऐरणीवर आला असून, प्रशासन जागे होऊन प्रत्यक्ष कृती कधी सुरू करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

### ऐन सणासुदीत दरवाढ;...

साठा नऊ वर्षांतील नीचांकी पातळीवर का पोहोचला, निर्यात थांबवून शुल्कमुक्त आयात करण्याची वेळ का आली आणि साखरेचा तुटवडा असताना ई-२० इथेनॉलसाठी ऊस व धान्य वळविण्याच्या धोरणाचा पुनर्विचार का केला जात नाही, असे सवाल उपस्थित केले आहेत. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनीही ई-२० धोरणावर टीका करत ऊस आणि धान्य इथेनॉल निर्मितीकडे वळवल्याने अन्नपदार्थांच्या उपलब्धतेवर परिणाम होत असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार, मोठ्या प्रमाणावर ऊस इथेनॉल निर्मितीकडे वळवल्यामुळे साखर आणि गुळाच्या किमतीत वाढ झाली आहे. मात्र, केंद्राच्या आयात निर्णयामुळे बाजारातील पुरवठा वाढून दर काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.एकीकडे साखरेच्या दरवाढीला लगाम घालण्यासाठी आयात आणि साठा मर्यादेचे निर्णय घेतले जात असताना, दुसरीकडे ऊस इथेनॉलकडे वळविण्याच्या धोरणावरून सरकारला काँग्रेसच्या टीकेला सामोरे जावे लागत आहे. आगामी सणासुदीच्या काळात या उपाययोजनांचा ग्राहकांना प्रत्यक्ष किती फायदा मिळतो आणि साखरेचे दर किती खाली येतात, याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

### मराठवाड्यात २ हजार १३४ कोटींचा...

यांनी या घोटाळ्याचा तपास लातूरच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवला आहे. एकंदरीत या प्रकरणानंतर लातूर शहरात एकच खळबळ उडाली आहे.उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या अगदी समोरच रात्री पैशांच्या देवाणघेवाणीवरून दोन गटांत जोरदार हाणामारी झाली. काही दिवसांपासून सुरू असलेल्या पैशांच्या व्यवहाराच्या वादातून शाब्दिक बाचाबाची झाली आणि त्यानंतर दोन्ही गट एकमेकांवर धावून गेले. यात सहभागी असलेल्या महिलाही जखमी झाल्या आहेत. घटना पोलीस ठाण्यासमोरच घडल्याने पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून दोन्ही गटांना वेगळे केले. त्यामुळे परिस्थिती अधिक चिघळण्यापासून रोखण्यात आली. या प्रकरणी पैशांचा नेमका व्यवहार आणि हाणामारीत सहभागी व्यक्तींबाबत पोलिसांचा तपास सुरू आहे.

### जरांगे पाटील उपोषणावर...

मग आम्हाला वर्षा बंगल्यावर बसू द्यायला काय हरकत आहे? आम्ही खोलीत बसणार नाही; बंगल्यावर बसू. वर्षा बंगल्यावर आंदोलन करण्यावर आम्ही ठाम आहोत, असे त्यांनी सांगितले.दरम्यान, आंदोलनाची घोषणा केल्यानंतर जरांगे पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्राचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी मराठा समाजाच्या बांधवांच्या भेटी घेत संवाद साधला. आगामी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.२९ ऑगस्ट जवळ येत असताना जरांगे पाटील यांच्या भूमिकेमुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सरकार आणि आंदोलकांमध्ये चर्चा होऊन तोडगा निघणार की जरांगे पाटील मुंबईत आमरण उपोषण सुरू करणार, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४